# गर्भधारणा-पूर्व व प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम, १९९४

## कलमांचा क्रम

कलमे

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**आनुवंशिकीय समुपदेशन केंद्रे, आनुवंशिकीय प्रयोगशाळा व आनुवंशिकीय चिकित्सालये यांचे विनियमन**

३. आनुवंशिकीय समुपदेशन केंद्रे, आनुवंशिकीय प्रयोगशाळा व आनुवंशिकीय चिकित्सालये यांचे विनियमन.

३ क. लिंग निवडीस प्रतिबंध.

३ ख. अधिनिमाअन्वये नोंदणी न केलेल्या व्यक्ती, प्रयोगशाळा, चिकित्सालये, इत्यादींना स्वनातीत यंत्र, इत्यादींची विक्री करण्यास प्रतिबंध.

प्रकरण तीन

**प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रांचे विनियमन**

४. प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रांचे विनियमन.

५. गर्भवती महिलेची लेखी संमती व गर्भाचे लिंग कळविण्यास प्रतिबंध.

६. गर्भलिंग निर्धारण करण्यास प्रतिबंध.

प्रकरण चार

**केंद्रीय पर्यवेक्षी मंडळ**

७. केंद्रीय पर्यवेक्षी मंडळ घटीत करणे.

८. सदस्यांचा पदावधी.

९. मंडळाच्या बैठकी.

१०. रिक्त पदे, इत्यादींमुळे, मंडळाचे कामकाज विधिअग्राह्य ठरणार नाही.

११. विशिष्ट प्रयोजनांकरिता मंडळामध्ये व्यक्तीचा तात्पुरता सहयोग.

१२. मंडळाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांची नियुक्ती.

१३. मंडळाचे आदेश व इतर संलेख यांचे अधिप्रमाणन.

१४. सदस्य म्हणून नियुक्तीसाठी अपात्रता.

१५. पुनर्नियुक्ती करण्याकरिता सदस्यांची पात्रता.

१६. मंडळाची कार्ये.

१६क. राज्य पर्यवेक्षी मंडळ व संघ राज्यक्षेत्र पर्यवेक्षी मंडळ घटीत करणे.

प्रकरण पाच

**समुचित प्राधिकरण आणि सल्लागार समिती**

१७. समुचित प्राधिकरण आणि सल्लागार समिती.

१७क. समुचित प्राधिकरणाचे अधिकार.

प्रकरण सहा

**आनुवंशिकीय समुपदेशन केंद्रे, आनुवंशिकीय प्रयोगशाळा आणि आनुवंशिकीय चिकित्सालये यांची नोंदणी**

१८. आनुवंशिकीय समुपदेशन केंद्रे, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालये यांची नोंदणी.

१९. नोंदणी प्रमाणपत्र.

२०. नोंदणी रद्द करणे किंवा निलंबित करणे.

२१. अपील.

प्रकरण सात

**अपराध व शास्ती**

२२. गर्भधारणापूर्व व प्रसव-पूर्व लिंग निर्धारणाच्या संबंधात जाहिरात करण्यास मनाई आणि त्याचे उल्लंघन करण्यासाठी शिक्षा.

२३. अपराध व शास्ती.

२४. प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रांचा वापर करण्याच्या बाबतीत गृहीतक.

२५. ज्या अधिनियमांच्या किंवा नियमांच्या ज्या तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल कोणत्याही विनिर्दिष्ट शिक्षेची तरतूद केलेली नसेल अशा अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दलची शास्ती.

२६. कंपन्यांनी केलेले अपराध.

२७. अपराध दखलपात्र, अजामनिपात्र व आपसात न मिटविण्याजोगा असणे.

२८. अपराधांची दखल.

प्रकरण आठ

**संकीर्ण**

२९. अभिलेख ठेवणे.

३०. अभिलेख, इत्यादींची झडती घेणे व जप्त करणे याचा अधिकार.

३१. सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

३१क. अडचणी दूर करणे.

३२. नियम करण्याचे अधिकार.

३३. विनियम करण्याचे अधिकार.

३४. संसदेपुढे मांडावयाचे नियम व विनियम.

# गर्भधारणा-पूर्व व प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम, १९९४

(सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ५७)

[ रोजी यथाविद्यमान ]

[२० सप्टेंबर, १९९४]

[१][**गर्भधारणा-पूर्व वा गर्भधारणोत्तर लिंग निवडीस प्रतिबंध करण्यासाठी आणि आनुवंशिक अपसामान्यता किंवा चयापचय विकार किंवा गुणसूत्रीय अपसामान्यता किंवा विवक्षित जन्मजात अपरचना किंवा लिंग-संलग्न विकार शोधून काढण्याच्या प्रयोजनार्थ प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रांचे विनियमन करण्याकरिता आणि ज्याची परिणती स्त्रीगर्भहत्येमध्ये होते अशा रीतीने लिंग निर्धारण करण्याच्या प्रयोजनार्थ या तंत्रांचा दुरूपयोग करण्यास प्रतिबंध करण्याकरिता आणि तत्संबंधित वा तदानुषंगीक बाबींची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**]

भारतीय गणराज्याच्या पंचेचाळिसाव्या वर्षी संसदेद्वारे पुढील प्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**१.** (१) या अधिनियमास [२][ गर्भधारणा-पूर्व व प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध)] अधिनियम, १९९४ असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

(२) तो, जम्मू व काश्मीर राज्यखेरीज करून संपूर्ण भारतास लागू होईल.

(३) तो, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [३] दिनांकास अंमलात येईल.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,— **व्याख्या.**

(क) " समुचित प्राधिकरण " याचा अर्थ, कलम १७ अन्वये नियुक्त केलेले समुचित प्राधिकरण, असा आहे ;

(ख) " मंडळ " याचा अर्थ, कलम ७ अन्वये घटित केलेले केंद्रीय पर्यवेक्षी मंडळ, असा आहे ;

[४][(खक) " गर्भधारित " याचा अर्थ, भ्रूणाचे बाह्यपटल तसेच भ्रूण व गर्भ यांसह फलनक्रियेपासून जन्मापर्यंतच्या विकासाच्या कोणत्याही टप्प्यावर असलेली गर्भधारणेची कोणतीही निर्मिती, असा आहे ;

(खख) " भ्रूण " याचा अर्थ, फलनानंतर आठ आठवडे (छप्पन दिवस) संपेपर्यंत विकसित होत जाणारा मानवी जीव, असा आहे ;

(खग) " गर्भ " याचा अर्थ, फलनानंतर किंवा निर्मितीनंतर सत्तावन्नाव्या दिवसापासून सुरू होऊन जन्माच्या वेळी संपणाऱ्या विकासाच्या कालावधीतील (विकास खुंटला असेल तो कालावधी वगळून) मानवी जीव, असा आहे ;]

(ग) " आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र " याचा अर्थ, रुग्णांना जेथे प्रजननविषयक सल्ला दिला जातो अशी संस्था, रुग्णालय, शुश्रूषालय किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे अन्य ठिकाण, असा आहे ;

(घ) " आनुवंशिकीय चिकित्सालय " याचा अर्थ, प्रसव-पूर्व रोगनिदान प्रक्रिया करण्यासाठी ज्याचा वापर केला जातो असे चिकित्सालय, संस्था, रुग्णालय, शुश्रूषालय किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे कोणतेही ठिकाण, असा आहे ;

---

१. सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम २ द्वारे दीर्घ शीर्षका ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे, "प्रसव-पूर्व निदान तंत्र (विनियमन व गैरवापरास प्रतिबंध) " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

३. दिनांक १० जानेवारी १९९६ रोजी अंमलात आला, पहा जी. एस. आर. ७०६, दिनांक २० डिसेंबर १९९५, भारताचे **राजपत्र**, असाधारण, भाग- दोन, कलम ३ (दोन), दिनांक २१ डिसेंबर १९९५ मध्ये प्रकाशित झाला.

४. सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम ४ द्वारे समाविष्ट करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

[1][**स्पष्टीकरण**.— या खंडाच्या प्रयोजनाकरिता, " आनुवंशिकीय चिकित्सालय " यामध्ये, स्वनातीत यंत्र किंवा प्रतिमादर्शक यंत्र किंवा क्रमवीक्षक किंवा गर्भाचे लिंग निर्धारित करणारे अन्य उपकरण किंवा गर्भार अवस्थेत लिंग ओळखण्याची किंवा गर्भधारणापूर्व लिंग निवड करण्याची क्षमता असणारे हातवाही उपकरण जेथे वापरण्यात येते असे वाहन, याचा समावेश होतो ;]

(ङ) " आनुवंशिकीय प्रयोगशाळा " याचा अर्थ, प्रयोगशाळा, असा आहे आणि त्यामध्ये प्रसव-पूर्व रोगनिदान चाचणीसाठी आनुवंशिकीय चिकित्सालयाकडून प्राप्त झालेल्या नमुन्यांचे विश्लेषण किंवा चाचण्या करण्याची सुविधा पुरविण्यात येत असेल अशा जागेचा समावेश होतो ;

[1][**स्पष्टीकरण**.— या खंडाच्या प्रयोजनाकरिता, " आनुवंशिकीय प्रयोगशाळा " यामध्ये, स्वनातीत यंत्र किंवा प्रतिमादर्शक यंत्र किंवा क्रमवीक्षक किंवा गर्भाचे लिंग निर्धारित करणारे अन्य उपकरण किंवा गर्भार अवस्थेत लिंग ओळखण्याची किंवा गर्भधारणापूर्व लिंग निवड करण्याची क्षमता असणारे हातवाही उपकरण जेथे वापरण्यात येते अशा जागेचा समावेश होतो ;]

(च) " स्त्रीरोगतज्ज्ञ " याचा अर्थ, स्त्रीरोगशास्त्र व प्रसूतिशास्त्र या विषयातील पदव्युत्तर अर्हता प्राप्त केलेली व्यक्ती, असा आहे, ;

[2][(छ) " वैद्यकीय अनुवंशशास्त्रज्ञ " यामध्ये लिंग निवड व प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे या क्षेत्रामधील प्रजननशास्त्र या विषयातील पदवी किंवा पदविका धारण करणाऱ्या किंवा पुढील अर्हता प्राप्त केल्यानंतर अशा क्षेत्रामधील दोन वर्षांपेक्षा कमी नसेल एवढ्या कालावधीचा अनुभव असलेल्या व्यक्तीचा समावेश होतो,—

(एक) भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ अन्वये मान्यताप्राप्त असलेल्या वैद्यकीय अर्हतांपैकी कोणतीही एक अर्हता ; किंवा **१९५६ चा १०२**

(दोन) जीवविज्ञानातील पदव्युत्तर पदवी ;]

(ज) " बालरोगचिकित्सक " याचा अर्थ, बालरोगचिकित्सा शास्त्रातील पदव्युत्तर अर्हता धारण करणारी व्यक्ती, असा आहे ;

[3][(झ) " प्रसव-पूर्व रोगनिदान प्रक्रिया " याचा अर्थ, गर्भधारणेपूर्वी किंवा त्यानंतर, लिंग निवडीकरिता कोणत्याही प्रकारचे विश्लेषण करण्यासाठी किंवा प्रसव-पूर्व रोगनिदान चाचण्या करण्यासाठी स्वनातीत -चित्रण (अल्ट्रासोनोग्राफी) करणे, गर्भ प्रतिमा-दर्शन (फोटोस्कोपी) करणे, आनुवंशिकीय प्रयोगशाळेकडे किंवा आनुवंशिकीय चिकित्सालयाकडे पाठविण्यासाठी गर्भजलाचे, जरायु उद्वर्धाचे (कोरियोनिक व्हिलाय), भ्रूणाचे, पुरुषाच्या किंवा गर्भधारणेपूर्वी वा नंतर स्त्रीच्या रक्ताचे किंवा इतर कोणत्याही ऊतीचे किंवा स्त्रावाचे नमुने घेणे किंवा ते काढणे यांसारखी संपूर्ण स्त्रीरोगशास्त्रीय किंवा प्रासविक किंवा वैद्यकीय प्रक्रिया, असा आहे ;]

(ञ) " प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे " यामध्ये, सर्व प्रसव-पूर्व रोगनिदान प्रक्रिया व प्रसव-पूर्व रोगनिदान चाचण्या यांचा समावेश होतो ;

[4][(ट) " प्रसव-पूर्व रोगनिदान चाचणी " याचा अर्थ, प्रजननदोष किंवा चयापचय दोष अथवा लिंग-गुणसूत्रविषयक अपसामान्यता किंवा जन्मजात विसंगती किंवा हिमोग्लोबीन विकृती किंवा लिंगसंलग्न रोग शोधून काढण्यासाठी गर्भवती स्त्रीचे किंवा गर्भाचे केलेले स्वनातीत-चित्रण किंवा तिचे गर्भजल, जरायु उद्वर्ध, रक्त किंवा कोणतीही ऊती किंवा स्राव यांची केलेली कोणतीही चाचणी किंवा विश्लेषण, असा आहे. ;]

---

१. सन २००३ चा अधिनियम १४, कलम ४ द्वारे समाविष्ट करण्यात आला ( १४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे, मूळ खंड (छ) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला ( १४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे, मूळ खंड (झ) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला ( १४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे, मूळ खंड (ट) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला ( १४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

(ठ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(ड) " नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी " याचा अर्थ, भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ याच्या कलम (२) च्या खंड (ज) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, कोणतीही मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता धारण करणारा आणि राज्य वैद्यक नोंदवहीत ज्याच्या नावाची नोंद करण्यात आली आहे असा, वैद्यक व्यवसायी, असा आहे ; **१९५६ चा १०२.**

(ढ) " विनियम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये, मंडळाने केलेले विनियम, असा आहे ;

[१][(ण) " लिंग निवड " यामध्ये, भ्रूण हे विशिष्ट लिंगाचे असणे सुनिश्चित करण्याच्या आणि तसे बनण्याची संभाव्यता वाढवण्याच्या प्रयोजनार्थ, करण्यात आलेली कोणतीही प्रक्रिया, तंत्र, चाचणी किंवा औषधयोजना किंवा औषधपत्र किंवा त्यासाठी केलेली कशाचीही तरतूद, यांचा समावेश होतो ;

(त) " स्वनातीत चित्रण प्रतिमा दर्शक तंत्र " याचा अर्थ, भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ या अन्वये, मान्यताप्राप्त असलेल्या वैद्यकीय अर्हतांपैकी कोणतीही एक अर्हता धारण करणारी व्यक्ती किंवा स्वनातीत चित्रण किंवा प्रतिमा दर्शक तंत्रे किंवा क्ष-किरण-शास्त्र यातील पदव्युत्तर अर्हता धारण करणारी व्यक्ती, असा आहे; **१९५६ चा १०२.**

(थ) " राज्य मंडळ " याचा अर्थ, कलम १६क अन्वये घटित करण्यात आलेले राज्य पर्यवेक्षी मंडळ किंवा संघ राज्यक्षेत्र पर्यवेक्षी मंडळ, असा आहे ;

(द) विधानमंडळ असलेल्या संघ राज्यक्षेत्राच्या संबंधात " राज्य शासन " याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये, राष्ट्रपतीने नियुक्त केलेला त्या संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक, असा आहे.]

## प्रकरण दोन

## आनुवंशिकीय समुपदेशन केंद्रे, आनुवंशिकीय प्रयोगशाळा व आनुवंशिकीय चिकित्सालये यांचे विनियमन

**आनुवंशिकीय समुपदेशन केंद्रे, आनुवंशिकीय प्रयोगशाळा व आनुवंशिकीय चिकित्सालये यांचे विनियमन.**

**३.** या अधिनियमाच्या प्रारंभास व तेव्हापासून,—

(१) कोणतेही आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय यांना, या अधिनियमान्वये त्यांची नोंदणी करण्यात आली असल्याखेरीज, प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्राशी संबंधित कार्य करता येणार नाही, किंवा ते करण्यात सहभागी होता येणार नाही किंवा ते करण्यात मदत करता येणार नाही ;

[२][(२) कोणतेही आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र किंवा आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय विहित करता येईल अशी अर्हता धारण न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तींची नियुक्ती करणार नाही किंवा करण्यास कारणीभूत होणार नाही किंवा तिची सेवा घेणार नाही, मग-ती मानधन तत्त्वावर असो वा वेतनावर असो ;]

(३) कोणताही वैद्यकीय अनुवंश शास्त्रज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, बालरोगचिकित्सक, नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी किंवा कोणतीही अन्य व्यक्ती स्वतः किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीमार्फत, या अधिनियमाद्वारे नोंदवलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी कोणतीही प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे वापरणार नाही किंवा वापरण्यास कारणीभूत किंवा साहाय्यभूत होणार नाही.

**लिंग निवडीस प्रतिबंध.**

[३][**३क.** वंध्यत्वाच्या क्षेत्रातील विशेषज्ज्ञ किंवा विशेषज्ज्ञांचा गट यांच्यासह कोणतीही व्यक्ती, एखाद्या स्त्रीवर किंवा पुरुषावर किंवा दोहोंवर किंवा त्यांच्यापैकी एकाकडून किंवा दोहोंकडून व्युत्पन्न झालेल्या कोणत्याही ऊती,भ्रूण, गर्भधारित द्रव किंवा युग्मक यांच्यावर लिंग निवडीची प्रक्रिया स्वतः किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून करणार नाही किंवा करण्यास कारणीभूत किंवा साहाय्यभूत होणार नाही ;

**अधिनियमाअन्वये नोंदणी न केलेल्या व्यक्ती, प्रयोगशाळा, चिकित्सालये, इत्यादींना स्वनातीत यंत्र, इत्यादींची विक्री करण्यास प्रतिबंध.**

**३ख.** कोणतीही व्यक्ती, ज्यांनी या अधिनियमान्वये नोंदणी न केलेल्या कोणत्याही आनुवंशिकीय समुपदेशन केंद्रास आनुवंशिकीय प्रयोगशाळेस, चिकित्सालयास किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस, गर्भाचे लिंग तपासण्यास सक्षम असलेले कोणतेही स्वनातीत यंत्र किंवा प्रतिमादर्शक यंत्र किंवा क्रमवीक्षक किंवा इतर कोणतीही सामग्री यांची विक्री करणार नाही.]

---

१. सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम ४ द्वारे हे खंड दाखल करण्यात आले (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ पोट-कलम (२) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

प्रकरण तीन

## प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रांचे विनियमन

**प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रांचे विनियमन.**

**४.** या अधिनियमाच्या प्रारंभास व तेव्हापासून,—

(१) खंड (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली प्रयोजने खेरीजकरून आणि खंड (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शर्तीची पूर्तता केल्यानंतर कोणत्याही व्यक्तीला, नोंदणी केलेले आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र किंवा आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय यांसह कोणत्याही ठिकाणाचा उपयोग, प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रांचा वापर करण्यासाठी किंवा असा वापर करण्याची व्यवस्था करण्यासाठी करता येणार नाही ;

(२) पुढीलपैकी कोणत्याही अपसामान्यतेची तपासणी करण्याच्या प्रयोजनाशिवाय प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्राचा वापर करता येणार नाही :—

(एक) गुणसूत्रीय अपसामान्यता ;

(दोन) आनुवंशिक-चयापचय-रोग ;

(तीन) हिमोग्लोबिन विकृती ;

(चार) लिंग-संलग्न आनुवंशिक रोग ;

(पाच) जन्मजात विसंगती ;

(सहा) केंद्रीय पर्यवेक्षी मंडळाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर अपसामान्यता किंवा रोग ;

[1][(३) प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्राचा वापर करण्यास अर्ह असलेल्या व्यक्तीची, पुढीलपैकी कोणतीही शर्त पूर्ण करण्यात आली असल्याबाबत, लेखी नमूद करावयाच्या कारणास्तव, खात्री पटली असल्याखेरीज, प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्राचा वापर करण्यात येणार नाही किंवा ते संचालित करण्यात येणार नाही :—

(एक) गर्भवती महिलेचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक आहे ;

(दोन) गर्भवती महिलेचा दोन किंवा अधिक वेळा आकस्मिक गर्भपात किंवा गर्भहानी झालेली आहे ;

(तीन) गर्भवती महिलेवर औषधिद्रव्ये, किरणोत्सर्ग, जंतुसंसर्ग किंवा रासायनिक द्रव्ये यांसारख्या गर्भविकृतिकारक पदार्थांचा मारा झालेला आहे ;

(चार) गर्भवती महिला किंवा तिचा पती यांना मतिमंदत्व किंवा स्नायुतानतेसारखी शारीरिक विरूपता किंवा कोणताही इतर आनुवंशिक रोग, यांची कौटुंबिक पार्श्वभूमी आहे ;

(पाच) मंडळाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी इतर कोणतीही शर्त :

परंतु असे की, गर्भवती महिलेची स्वनातीत चित्रण करणारी व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा रीतीने चिकित्सालयात त्याचा संपूर्ण अभिलेख ठेवील आणि त्यात आढळलेली कोणतीही कमतरता किंवा दोषपूर्णता राहिल्यास असे स्वनातीत चित्रण करणाऱ्या व्यक्तीला एतद्‌विरुद्ध सिद्ध करता आले नाही तर, कलम ५ किंवा कलम ६ च्या तरतुदींचे उल्लंघन मानले जाईल.

(४) गर्भवती महिलेचा नातेवाईक किंवा पती यांसह कोणतीही व्यक्ती, खंड (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनाशिवाय, तिच्यावर कोणत्याही प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रांचा वापर करण्याची मागणी करणार नाही किंवा त्यास उत्तेजन देणार नाही ;

(५) महिलेचा नातेवाईक किंवा पती यांसह कोणतीही व्यक्ती, तिच्यावर किंवा त्याच्यावर किंवा दोघांवरही कोणत्याही लिंग निवड तंत्राचा वापर करण्याची मागणी करणार नाही किंवा त्यास उत्तेजन देणार नाही.]

**गर्भवती महिलेची लेखी संमती व गर्भाचे लिंग कळविण्यास प्रतिबंध.**

**५.** (१) कलम ३ च्या खंड (२) मध्ये निर्दिष्ट केलेली कोणताही व्यक्ती,—

(क) संबंधित गर्भवती महिलेस, आपल्याला ज्ञात असलेल्या सर्व बाबींचे व अशा पद्धतींच्या उत्तरीय परिणामांचे स्पष्टीकरण केल्याशिवाय ;

(ख) त्या महिलेकडून अशी पद्धती वापरण्याची लेखी संमती, तिला समजणाऱ्या भाषेत, विहित नमुन्यात प्राप्त केल्याशिवाय ; आणि

---

[1] सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम ७ द्वारे उपखंड (३) व (४) दाखल करण्यात आले ( १४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

(ग) खंड (ख) अन्वये प्राप्त केलेली गर्भवती महिलेच्या लेखी समंतीची प्रत तिला दिल्याशिवाय ; प्रसव-पूर्व निदान पद्धतीचा वापर करणार नाही.

[१][(२) प्रसव-पूर्व रोगनिदान पद्धतीचे चालन करणाऱ्या व्यक्तीसह कोणतीही व्यक्ती, संबंधित गर्भवती महिलेस किंवा तिच्या नातेवाईकास किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस अक्षर, खुणा यांद्वारे किंवा कोणत्याही इतर रीतीने, गर्भाचे लिंग कळविणार नाही.]

**गर्भलिंग निर्धारण करण्यास प्रतिबंध.**

**६.** या अधिनियमाच्या प्रारंभास व तेव्हापासून,—

(क) कोणतेही आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र किंवा आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय आपल्या केंद्रात, प्रयोगशाळेत किंवा चिकित्सालयात गर्भलिंग निर्धारण करण्याच्या प्रयोजनकरिता स्वनातीत चित्रणासह प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्राचा वापर करणार नाही किंवा वापर करण्यास कारणीभूत होणार नाही.

(ख) कोणतीही व्यक्ती, गर्भलिंग निर्धारण करण्याच्या प्रयोजनासाठी स्वनातीत चित्रणासह कोणत्याही प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रांचा वापर करणार नाही किंवा करण्यास कारणीभूत होणार नाही.

[२][(ग) कोणतीही व्यक्ती, येनकेन प्रकारे, गर्भधारणेपूर्वी किंवा नंतर लिंगाची निवड करणार नाही किंवा करण्यास मुभा देणार नाही.]

प्रकरण चार

## केंद्रीय पर्यवेक्षी मंडळ

**केंद्रीय पर्यवेक्षी मंडळ घटित करणे.**

**७.** (१) केंद्र सरकार, या अधिनियमाअन्वये मंडळाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व कर्तव्ये पार पाडण्यासाठी, केंद्रीय पर्यवेक्षी मंडळ म्हणून ओळखले जाणारे मंडळ घटित करील.

(२) हे मंडळ, पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल,—

(क) कुटुंब कल्याण मंत्रालय किंवा विभाग याचा प्रभारी असलेला मंत्री–पदसिद्ध अध्यक्ष ;

(ख) कुटुंब कल्याण विभागाचा प्रभारी असलेला, भारत सरकारचा सचिव-पदसिद्ध उपाध्यक्ष ;

[३][(ग)] महिला व बालविकास यांचा प्रभार असलेली, केंद्र सरकारची मंत्रालये ; विधि व न्याय मंत्रालयातील विधिविषयक कामकाज विभाग किंवा वैधनिक विभाग आणि भारतीय औषध व होमिओपॅथी पद्धती या सेवांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी केंद्र सरकारने नियुक्त करावयाचे तीन पदसिद्ध सदस्य ;]

(घ) केंद्र सरकारचा आरोग्य सेवा महासंचालक- पदसिद्ध सदस्य ;]

(ङ) केंद्र सरकारने नियुक्त करावयाचे दहा सदस्य, पुढीलपैकी प्रत्येकातून दोन याप्रमाणे असतील—

(एक) निष्णात वैद्यकीय अनुवंशशास्त्रज्ञ ;

[४][(दोन) निष्णात स्त्रीरोगतज्ज्ञ व प्रसूतिशास्त्रज्ञ किंवा स्त्रीरोग किंवा प्रसूतितंत्र यांचा तज्ज्ञ ;]

(तीन) निष्णात बालरोग चिकित्सक ;

(चार) निष्णात समाजशास्त्रज्ञ ; व

(पाच) महिला कल्याण संघटनांचे प्रतिनिधी ;

(च) संसदेच्या तीन महिला सदस्य, यांच्यापैकी दोघींची लोकसभेकडून व एकीची राज्यसभेकडून निवड करण्यात येईल ;

(छ) राज्ये व संघ राज्यक्षेत्रे यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी, वर्णक्रमानुसार दोन व उलट वर्णक्रमानुसार दोन याप्रमाणे केंद्र सरकारने आळीपाळीने नियुक्त करावयाचे चार सदस्य :

परंतु असे की, राज्य शासनाच्या किंवा, यथास्थिति, संघ राज्यक्षेत्राच्या शिफारशीशिवाय या खंडान्वये कोणतीही नियुक्ती करण्यात येणार नाही.

---

[१] सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम ८ द्वारे, पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे, खंड (ग) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे, उप खंड (दोन) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

(ज) कुटुंब कल्याणाचा प्रभारी असलेला, केंद्र सरकारच्या सहसचिवापेक्षा कमी दर्जाचा नसलेला किंवा त्याला समतुल्य असलेला असा अधिकारी- पदसिद्ध सदस्य-सचिव ;

सदस्यांचा पदावधी.

**८.** (१) पदसिद्ध सदस्यांखेरीज अन्य सदस्यांचा पदावधी,—

(क) कलम ७ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ङ) किंवा खंड (च) अन्वये नियुक्ती केली असेल तर, तीन वर्षे : [१][* * * ]

[२][परंतु असे की, कलम ७ च्या पोट-कलम (२) च्या खंड (च) अन्वये निवडून आलेल्या सदस्याचा पदावधी, तो मंत्री किंवा राज्यमंत्री किंवा उपमंत्री किंवा लोकसभेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा राज्यसभेचा उपसभापती होताच किंवा तो जेथून निवडून आला असेल त्या सभागृहाचा सदस्य असण्याचे बंद होताच संपुष्टात येईल ; आणि ]

(ख) उक्त पोट-कलमाच्या खंड (छ) अन्वये नियुक्ती केली असेल तर एक वर्ष इतका असेल.

(२) इतर कोणत्याही सदस्याचे नैमत्तिक पद मग त्याचा मृत्यू, राजीनामा किंवा त्याच्या आजारपणामुळे त्याची कार्ये पार पाडण्यास येणारी असमर्थता किंवा इतर अक्षमता यामुळे असो रिक्त झाले तर, असे रिक्त पद केंद्र सरकार, नव्याने नियुक्ती करून भरील आणि अशा रीतीने नियुक्त करण्यात आलेला सदस्य, तो जिच्या जागेवर नियुक्त करण्यात आला असेल त्या व्यक्तीच्या पदावधीतील उर्वरित कालावधीसाठी ते पद धारण करील.

(३) उपाध्यक्ष, अध्यक्षाकडून त्यास वेळोवेळी नेमून देण्यात येतील अशी कार्ये पार पाडील.

(४) आपापली कार्ये पार पाडण्याकरिता सदस्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती विहित केल्याप्रमाणे असेल.

मंडळाच्या बैठकी.

**९.** (१) मंडळ आपल्या बैठकी, विनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल अशा वेळी व ठिकाणी घेईल आणि अशा बैठकीचे कामकाज (अशा बैठकीच्या वेळी गणपूर्तीसह) चालविण्याच्या बाबत विनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल अशा कार्यपद्धतीविषयक नियमांचे पालन करील :

परंतु असे की, सहा महिन्यांतून किमान एकदा मंडळाची बैठक घेण्यात येईल.

(२) अध्यक्ष व त्यांच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष मंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थानी राहतील.

(३) अध्यक्ष व उपाध्यक्ष जर कोणत्याही कारणास्तव मंडळाच्या कोणत्याही बैठकीला उपस्थित राहू शकले नाहीत तर, बैठकीला उपस्थित असलेल्या सदस्यांनी निवडून दिलेला सदस्य बैठकीच्या अध्यक्षपदी राहील.

(४) मंडळाच्या कोणत्याही बैठकीपुढे येणाऱ्या सर्व प्रश्नांवरील निर्णय बैठकीला उपस्थित असलेल्या व मतदानास पात्र असलेल्या सदस्यांच्या बहुमताने घेतले जातील आणि समसमान मते पडली असतील तर अशा परिस्थितीत अध्यक्ष किंवा त्याच्या अनुपस्थितीत अध्यक्षपदस्थ व्यक्ती, आपले दुसरे किंवा निर्णायक मत देईल व त्याचा वापर करील.

(५) पदसिद्ध सदस्यांशिवाय अन्य सदस्य, मंडळाने, विहित केल्याप्रमाणे, कोणतेही असल्यास भत्ते घेतील.

रिक्त पदे इत्यादींमुळे, मंडळाचे कामकाज विधिअग्राह्य ठरणार नाही.

**१०.** केवळ खालील कारणांमुळे मंडळाची कोणतीही कृती अगर कार्यवाही विधिअग्राह्य ठरणार नाही,—

(क) मंडळातील कोणतेही पद रिक्त असल्यास, किंवा मंडळाच्या घटनेत कोणतीही त्रुटी असल्यास ; किंवा

(ख) मंडळाचा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नियुक्तीमध्ये कोणतीही त्रुटी राहिल्यास ; किंवा

(ग) प्रकरणाच्या गुणावगुणावर परिणाम न करणारी मंडळाच्या कामकाजतील कोणतीही नियमबाह्य बाब.

विशिष्ट प्रयोजनांकरिता मंडळामध्ये व्यक्तीचा तात्पुरता सहयोग.

**११.** (१) मंडळास, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अंमलात आणण्यासाठी एखाद्या व्यक्तीचे साहाय्य किंवा सल्ला घेण्याची इच्छा झाल्यास, विनियमांनुसार निर्धारित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा प्रयोजनाकरिता त्या व्यक्तीला सहयोगी करून घेता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये मंडळाने कोणत्याही प्रयोजनाकरिता आपल्यात सहयोगी करून घेतलेल्या व्यक्तीला त्या प्रयोजनाशी संबंधित असलेल्या चर्चेत भाग घेण्याचा हक्क असेल, पण मंडळाच्या बैठकीत त्याला मतदानाचा हक्क असणार नाही आणि इतर कोणत्याही प्रयोजनाकरिता तो मंडळाचा सदस्य असणार नाही.

---

[१] सन २००१ चा अधिनियम क्रमांक ३२, कलम २ द्वारे, " आणि " हा शब्द वगळण्यात आला (३ सप्टेंबर २००१ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (३ सप्टेंबर २००१ रोजी व तेव्हापासून).

**१२.** (१) या अधिनियमाअन्वये आपली कार्ये सुरळीपणे पार पाडणे शक्य व्हावे म्हणून, मंडळाला याबाबत केलेल्या विनियमांच्या अधीन राहून (प्रतिनियुक्तीवर वा अन्यथा) त्यांना आवश्यक वाटतील इतके अधिकारी व इतर कर्मचारी यांची नियुक्ती करता येईल : **मंडळाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांची नियुक्ती.**

परंतु असे की, अशा विनियमामध्ये विनिर्दिष्ट केले असेल त्याप्रमाणे, प्रवर्गाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती, केंद्र सरकारच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येईल.

(२) मंडळाने नियुक्त केलेला प्रत्येक अधिकारी किंवा इतर कर्मचारी विनियमामध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशा सेवाशर्तींच्या अधीन असतील आणि अशा पारिश्रमिकासाठी ते हक्कदार असतील.

**१३.** मंडळाचे सर्व आदेश व निर्णय अध्यक्षाच्या किंवा मंडळाने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही सदस्यांच्या स्वाक्षरीने अधिप्रमाणित करण्यात येतील आणि मंडळाने काढलेले इतर संलेख सदस्य-सचिवांच्या स्वाक्षरीने किंवा मंडळाने याबाबतीत तशाच प्रकारे प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने अधिप्रमाणित करण्यात येतील. **मंडळाचे आदेश व इतर संलेख यांचे अधिप्रमाणन.**

**१४.** सदस्य म्हणून एखादी व्यक्ती नियुक्त करताना, जर ती,– **सदस्य म्हणून नियुक्तीसाठी अपात्रता.**

(क) केंद्र सरकारच्या मते ज्यात नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव आहे अशा अपराधाबद्दल सिद्धदोष ठरलेली असेल आणि त्यासाठी तिला करावासाची शिक्षा झालेली असेल ; किंवा

(ख) अविमुक्त नादार असेल ; किंवा

(ग) विकल मनाची असेल व सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केले असेल ; किंवा

(घ) सरकारच्या किंवा सरकारची मालकी आणि नियंत्रण असलेल्या महामंडळाच्या सेवेमधून तिला काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल ; किंवा

(ङ) केंद्र सरकारच्या मते आणि सदस्य म्हणून तिची कार्ये पार पाडताना तिला ते बाधक ठरण्याची शक्यता असेल असे, तिचे मंडळात आर्थिक किंवा इतर हितसंबंध असतील ; किंवा

[१][(च) केंद्र सरकारच्या मते, लिंगनिर्धारण करण्यासाठी कोणत्याही प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्राचा वापर करण्याशी किंवा अशा तंत्राला चालना देण्याशी अथवा लिंगनिवडीच्या कोणत्याही तंत्राशी संबंधित असेल,]

तर तिला अपात्र ठरविण्यात येईल.

**१५.** विहित केले असेल त्याप्रमाणे सेवांच्या इतर अटी व शर्तींच्या अधीन राहून, जिचे सदस्यत्व संपुष्टात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीला सदस्य म्हणून पुनर्नियुक्तीस पात्र ठरविण्यात येईल : **पुनर्नियुक्ती करण्याकरिता सदस्याची पात्रता.**

[२][परंतु असे की, पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही सदस्याची लागोपाठ दोन पदावधींपेक्षा अधिक कालावधीसाठी नियुक्ती केली जाणार नाही. ]

[३][**१६.** मंडळाची कार्ये खालीलप्रमाणे असतील,— **मंडळाची कार्ये.**

(एक) प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे व लिंग निवड तंत्रे यांचा वापर करण्याबाबत व त्यांचा दुरुपयोग होऊ नये यासाठी धोरण ठरविण्यात केंद्र सरकारला सल्ला देणे ;

(दोन) अधिनियम व त्याखाली करण्यात आलेले नियम यांचे पुनर्विलोकन करणे व त्यांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे आणि उक्त अधिनियम व नियम यामध्ये बदल करण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करणे ;

(तीन) गर्भधारणा-पूर्व लिंग निवड करणे आणि ज्याची परिणती स्त्रीगर्भ हत्येत होईल अशा रीतीने प्रसव-पूर्व गर्भलिंग निर्धारण करणे या प्रथांविरुद्ध जनजागृती करणे ;

(चार) आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा व आनुवंशिकीय चिकित्सालयात काम करणाऱ्या व्यक्तींनी पालन करावयाची आचारसंहिता घालून देणे ;

---

१. सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम ११ द्वारे, खंड (च) ऐवजी दाखल करण्यात आला ( १४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे, समाविष्ट करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे, कलम १६ ऐवजी दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

(पाच) या अधिनियमाअन्वये घटित करण्यात आलेल्या वेगवेगळ्या मंडळांच्या कामकाजावर लक्ष ठेवणे आणि त्यांच्या योग्य व प्रभावी अंमलबजावणीची सुनिश्चिती करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करणे ;

(सहा) या अधिनियमामध्ये विहित केली असतील अशी इतर कोणतीही कार्ये. ]

[1][**राज्य पर्यवेक्षी मंडळ संघ राज्यक्षेत्र पर्यवेक्षी मंडळ घटित करणे.**

**१६क.** (१) विधानमंडळ असलेले प्रत्येक राज्य व संघ राज्यक्षेत्र, राज्य पर्यवेक्षी मंडळ किंवा, यथस्थिति, संघ राज्यक्षेत्र पर्यवेक्षी मंडळ म्हणून ओळखले जाणारे एक मंडळ घटित करील. त्याची कार्ये पुढीलप्रमाणे असतील :–

(एक) गर्भधारणा-पूर्व लिंग निवड करणे आणि ज्याची परिणती स्त्रीगर्भ हत्येत होईल अशा रीतीने प्रसव-पूर्व लिंग निर्धारण करणे या प्रथांविरुद्ध राज्यामध्ये जनजागरण करणे ;

(दोन) राज्यात काम करण्याऱ्या समुचित प्राधिकरणांच्या कार्याचे पुनर्विलोकन करणे आणि त्यांच्याविरुद्ध योग्य त्या कारवाईची शिफारस करणे ;

(तीन) अधिनियम आणि नियमांच्या तरतुदींच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे व मंडळाकडे त्यांच्याशी संबंधित योग्य त्या शिफारशी करणे ;

(चार) या अधिनियमाअन्वये राज्यात हाती घेतलेल्या विविध कृती-कार्यक्रमांच्या बाबतीत विहित करण्यात येतील असे एकत्रित अहवाल मंडळाकडे आणि केंद्र सरकारकडे पाठवणे ; आणि

(पाच) अधिनियमाअन्वये विहित करण्यात येतील अशी अन्य कोणतीही कार्ये करणे.

(२) राज्य मंडळ पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल,—

(क) राज्यातील आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचा प्रभारी मंत्री-पदसिद्ध अध्यक्ष ;

(ख) आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचा प्रभारी सचिव-पदसिद्ध उपाध्यक्ष ;

(ग) महिला व बाल विकास, समाजकल्याण, विधि विभाग आणि भारतीय औषध व होमिओपॅथी पद्धती यांचे प्रभारी असलेले सचिव किंवा आयुक्त-पदसिद्ध सदस्य किंवा त्यांचे प्रतिनिधी ;

(घ) राज्य शासनाचे आरोग्य व कुटुंब कल्याण संचालक किंवा भारतीय औषध व होमिओपॅथी पद्धती संचालक-पदसिद्ध सदस्य ;

(ङ) विधानसभेच्या किंवा विधानपरिषदेच्या तीन महिला सदस्य ;

(च) खालील प्रवर्गातून प्रत्येकी दोन याप्रमाणे राज्य शासनाने नियुक्त करावयाचे दहा सदस्य असतील :–

(एक) निष्णात समाजशास्त्रज्ञ व विधि तज्ज्ञ ;

(दोन) अशासकीय वा अन्य संघटनांतील नामवंत महिला कार्यकर्त्या ;

(तीन) निष्णात स्त्रीरोगतज्ज्ञ आणि प्रसूतीतज्ज्ञ किंवा स्त्रीरोग किंवा प्रसूति-तंत्र यांचा तज्ज्ञ ;

(चार) निष्णात बालरोगतज्ज्ञ किंवा वैद्यकीय अनुवंशशास्त्रज्ञ ;

(पाच) निष्णात क्ष-किरण शास्त्रज्ञ किंवा सोनोलॉजिस्ट ;

(छ) कुटुंब कल्याण विभागाच्या सह संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला अधिकारी-पदसिद्ध सदस्य-सचिव.

(३) राज्य मंडळ, चार महिन्यांतून किमान एकदा बैठक घेईल.

(४) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्यांचा पदावधी तीन वर्षांचा असेल.

(५) पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही सदस्याचे पद रिक्त झाल्यास ते नव्याने नियुक्ती करून भरण्यात येईल.

(६) जर विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा सदस्य असलेली कोणतीही व्यक्ती राज्य मंडळाची सदस्य असेल आणि ती, मंत्री किंवा विधानसभेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा विधानपरिषदेचा सभापती किंवा उपसभापती झाली, तर ती राज्य मंडळाची सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल.

---

[1] सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम १४ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

(७) राज्य मंडळाच्या एकूण सदस्य संख्येच्या एक तृतीयांश सदस्यांनी गणपूर्ती होईल.

(८) राज्य मंडळाला, त्याला आवश्यक वाटेल त्या रीतीने आणि तेव्हा, एखाद्या सदस्यास स्वीकृत करून घेता येईल. परंतु अशा स्वीकृत करून घेतलेल्या सदस्यांची संख्या, राज्य मंडळाच्या एकूण सदस्य संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा अधिक होता कामा नये.

(९) स्वीकृत सदस्यांना अन्य सदस्यांप्रमाणे अधिकार व कार्ये असतील. मात्र, त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही आणि ते नियम व विनियम यांचे पालन करण्यास बांधील असतील.

(१०) या कलमात, विनिर्दिष्ट न केलेल्या बाबींबाबत, राज्य मंडळ, त्यास लागू असलेल्या कार्यपद्धतीचे व शर्तीचे अनुसरण करील.]

प्रकरण पाच

## समुचित प्राधिकरण आणि सल्लागार समिती

**समुचित प्राधिकरण आणि सल्लागार समिती.**

**१७.** (१) केंद्र सरकार, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे प्रत्येक संघ राज्यक्षेत्रासाठी एक किंवा अधिक समुचित प्राधिकरणाची नियुक्ती करील.

(२) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ज्याची परिणती स्त्रीगर्भहत्येमध्ये होते अशा रीतीने प्रसव-पूर्व लिंगनिर्धारण करण्याच्या समस्येची तीव्रता लक्षात घेऊन, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ संपूर्ण राज्यासाठी किंवा राज्याच्या भागासाठी एक किंवा अधिक समुचित प्राधिकरणाची नियुक्ती करील.

(३) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये नियुक्त करण्यात आलेले समुचित प्राधिकरण हे,—

[१][(क) जेव्हा संपूर्ण राज्य किंवा संघ राज्यक्षेत्रासाठी नियुक्त करण्यात येत असेल तेव्हा ते पुढील तीन सदस्यांनी मिळून बनलेले असेल.

(एक) आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या सहसंचालकाच्या दर्जाचा किंवा त्याच्या वरच्या दर्जाचा अधिकारी-अध्यक्षपदस्थ ;

(दोन) महिला संघटनेचे प्रतिनिधित्व करणारी नामवंत महिला ; आणि

(तीन) संबंधित राज्याचा किंवा संघ राज्यक्षेत्राचा संबंधित विधि विभागाचा अधिकारी :

परंतु असे की, प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे (विनियमन व गैरवापरास प्रतिबंध) सुधारणा अधिनियम, २००२ अंमलात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, बहुसदस्यीय राज्य वा संघ राज्यक्षेत्रस्तरीय समुचित प्राधिकरण घटित करणे हे संबंधित राज्याचे व संघ राज्यक्षेत्राचे कर्तव्य असेल : (२००३ चा १४.)

परंतु आणखी असे की, त्यात रिक्त होणारे कोणतेही पद हे, रिक्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत भरले जाईल ;]

(ख) जेव्हा, राज्य किंवा संघ राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागासाठी नियुक्त करण्यात येईल तेव्हा राज्य शासन किंवा यथास्थिति, केंद्र सरकार यांस योग्य वाटेल अशा अन्य दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल.

(४) समुचित प्राधिकरणाची कार्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(क) आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय यांच्या नोंदणीला मान्यता देणे, ती निलंबित किंवा रद्द करणे ;

(ख) आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा आणि आनुवंशिकीय चिकित्सालय यासाठी विहित केलेली मानके अंमलात आणणे ;

(ग) या अधिनियमाच्या तरतुदींचा किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांचा भंग केल्याच्या तक्रारीचे अन्वेषण करून त्यावर तात्काळ कारवाई करणे ;

---

[१] सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम १५ द्वारे खंड (क) दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

(घ) नोंदणीसाठी केलेल्या अर्जावर आणि नोंदणी निलंबित करण्यासाठी किंवा ती रद्द करण्यासाठी केलेल्या तक्रारीवर, पोटकलम (५) अन्वये घटित केलेल्या सल्लागार समितीचा सल्ला मागणे आणि तो विचारात घेणे ;

[१][(ङ) कोणत्याही ठिकाणी कोणत्याही व्यक्तीद्वारे कोणत्याही लिंग निवडीच्या तंत्राचा वापर करण्याविरुद्ध स्वतः होऊन किंवा ते निदर्शनास आणून दिल्यावरून उचित कायदेशीर कार्यवाही करणे, आणि अशा प्रकरणी स्वतंत्र अन्वेषण करण्यास सुरूवात करणे ;

(च) लिंग निवड किंवा प्रसव-पूर्व लिंग निर्धारण या प्रथांविरुद्ध जनजागृती करणे ;

(छ) अधिनियमाच्या आणि नियमांच्या तरतुदींच्या अंमलबजावणीवर देखरेख करणे ;

(ज) तांत्रिक किंवा सामाजिक स्थितीतील बदलांनुसार नियमांत आवश्यक असलेल्या फेरबदलासाठी मंडळ आणि राज्य मंडळांकडे शिफारशी करणे ;

(झ) नोंदणी निलंबित करण्यासाठी किंवा ती रद्द करण्यासाठी केलेल्या तक्रारींचे अन्वेषण केल्यानंतर सल्लागार समितीने केलेल्या शिफारशींनुसार कारवाई करणे.]

(५) केंद्र सरकार किंवा, यथास्थिति, राज्य शासन, समुचित प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यात त्याला मदत व सल्ला देण्यासाठी अशा प्रत्येक समुचित प्राधिकारणाकरिता एक सल्लागार समिती घटित करील आणि सल्लागार समितीच्या सदस्यांमधील एकाची तिचा अध्यक्ष म्हणून नियुक्ती करील.

(६) सल्लागार समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल,—

(क) स्त्रीरोगतज्ज्ञ, प्रसूतितज्ज्ञ, बालरोग चिकित्सक आणि वैद्यकीय अनुवंशशास्त्रज्ञ यांमधून तीन वैद्यकीय तज्ज्ञ ;

(ख) एक विधितज्ज्ञ ;

(ग) राज्य शासन किंवा, यथास्थिति, संघ राज्यक्षेत्राच्या माहिती व प्रसिद्धीशी संबंधित असलेल्या विभागाचे प्रतिनिधित्व करणारा एक अधिकारी ;

(घ) तीन नामवंत सामाजिक कार्यकर्ते, यांपैकी महिला संघटनांच्या प्रतिनिधींमधून किमान एकजण असेल.

[२][(७) लिंगनिर्धारणासाठी किंवा लिंगनिवडीसाठी प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्राचा वापर करणे किंवा त्यास चालना देणे यांच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीची सल्लागार समितीचा सदस्य म्हणून नियुक्ती केली जाणार नाही.]

(८) सल्लागार समितीस नोंदणी बद्दलच्या कोणत्याही अर्जावर किंवा नोंदणी निलंबित किंवा रद्द करण्यासाठी केलेल्या कोणत्याही तक्रारींवर विचार करण्यासाठी समुचित प्राधिकरणाच्या विनंतीवरून किंवा तिला ज्या ज्या वेळी योग्य वाटेल त्या त्या वेळी बैठक घेऊन त्यावर सल्ला देता येईल :

परंतु असे की, कोणत्याही दोन बैठकींच्या मधला कालावधी हा विहित कालावधीपेक्षा अधिक असणार नाही.

(९) सल्लागार समितीवर, एखाद्या व्यक्तीची नियुक्ती ज्यांच्या अधीन राहून करण्यात येईल अशा अटी व शर्ती आणि अशा समितीची कामे पार पाडण्यासाठी तिने अनुसरावयाची कार्यपद्धती या बाबी, विहित केल्याप्रमाणे असतील.

**[३][समुचित प्राधिकरणाचे अधिकार.**

**१७क.** समुचित प्राधिकरणास, पुढील बाबतीत अधिकार असतील :-

(क) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग करण्याच्या संबंधातील कोणतीही माहिती बाळगणाऱ्या अशा कोणत्याही व्यक्तीस समन्स पाठवणे ;

(ख) खंड (क) शी संबंधित कोणताही दस्तऐवज किंवा महत्त्वाची वस्तू सादर करणे ;

(ग) लिंग निवड तंत्रे किंवा प्रसव-पूर्व लिंग निर्धारण करण्यामध्ये गुंतल्याचा संशय असलेल्या कोणत्याही ठिकाणाची झडती घेण्यासाठी वॉरंट काढणे ; आणि

(घ) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.]

---

१. सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम १५ द्वारे समाविष्ट करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या, कलम १५ द्वारे, पोटकलम (७) ऐवजी दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे, समाविष्ट करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

प्रकरण सहा

## आनुवंशिकीय समुपदेशन केंद्रे, आनुवंशिकीय प्रयोगशाळा आणि आनुवंशिकीय चिकित्सालये यांची नोंदणी

२००३ चा १४. **१८.** [१][(१) कोणतीही व्यक्ती, प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे (विनियमन व गैरवापरास प्रतिबंध) सुधारणा अधिनियम, २००२ याच्या प्रारंभानंतर, स्वनातीत किंवा प्रतिमादर्शक यंत्र किंवा क्रमवीक्षक यंत्र किंवा गर्भ लिंगनिर्धारण किंवा लिंग निवड करू शकणारे किंवा त्यापैकी कशाचीही सेवा देणारे चिकित्सालय, प्रयोगशाळा किंवा केंद्र यांसह कोणतेही आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा आणि आनुवंशिकीय चिकित्सालय, यांची त्या अधिनियमान्वये रीतसर नोंदणी केल्याशिवाय असे कोणतेही केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय सुरू करणार नाही.] **आनुवंशिकीय समुपदेशन केंद्रे, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालये यांची नोंदणी.**

(२) पोटकलम (१) अन्वये नोंदणीसाठी केलेला प्रत्येक अर्ज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने, समुचित प्राधिकरणाकडे करण्यात येईल आणि त्यासोबत विहित करण्यात येईल अशी फी देण्यात येईल.

(३) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कलम ४ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्राबाबत समुपदेशन करण्याच्या किंवा त्या तंत्रांचे संचालन करण्याच्या कामात अंशतः किंवा पूर्णतः गुंतलेले प्रत्येक आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत नोंदणीसाठी अर्ज करील.

(४) कलम ६ च्या तरतुदींना अधीन राहून, प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रांबाबत समुपदेशन करणारे किंवा त्यांचे संचालन करणारे प्रत्येक आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय नोंदणीसाठी अर्ज करून स्वतंत्रपणे किंवा संयुक्तपणे त्यांची नोंदणी करण्यात आली नसेल तर, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर किंवा असा अर्ज निकालात काढण्यात येईपर्यंत, यांपैकी जे आधी घडेल तोपर्यंत असे प्रत्येक केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय असे कोणतेही समुपदेशन करण्याचे किंवा तंत्र वापरण्याचे बंद करील.

(५) कोणतेही आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय, विहित केल्या असतील अशा सुविधा पुरविण्याच्या, अशी उपकरणे बाळगण्याच्या व असा दर्जा सांभाळण्याच्या स्थितीत आहे याबाबत खात्री झाल्याशिवाय, समुचित प्राधिकरण या अधिनियमाअन्वये असे समुपदेशन केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यांची नोंदणी करणार नाही.

**१९.** (१) समुचित प्राधिकरण, चौकशी केल्यानंतर, आणि अर्जदारने या अधिनियमाच्या व त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांच्या आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता केलेली आहे अशी स्वतःची खात्री पटल्यानंतर आणि सल्लागार समितीचा यासंबंधी दिलेला सल्ला लक्षात घेऊन आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा, यथास्थिति, आनुवंशिकीय चिकित्सालय यांना संयुक्तपणे किंवा स्वतंत्रपणे विहित नमुन्यातील नोंदणी प्रमाणपत्र देईल. **नोंदणी प्रमाणपत्र.**

(२) जर चौकशी केल्यानंतर आणि अर्जदारास आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर व सल्लागार समितीचा सल्ला लक्षात घेतल्यानंतर, अर्जदाराने या अधिनियमाखालील किंवा नियमाखालील आवश्यक बाबींची पूर्तता केलेली नाही याबाबत समुचित प्राधिकरणाची खात्री पटल्यास, ते, नाकारण्यासंबंधीच्या कारणांची लेखी स्वरूपात नोंद करून, नोंदणीचा अर्ज नाकारील.

(३) प्रत्येक नोंदणी प्रमाणपत्राचे विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा मुदतीनंतर आणि फी दिल्यानंतर नवीकरण करण्यात येईल.

(४) नोंदणीकृत आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय यांच्या व्यवसायाच्या जागेत, ठळक ठिकाणी नोंदणी प्रमाणपत्र लावण्यात येईल.

**२०.** समुचित प्राधिकरणास स्वतः होऊन किंवा तक्रार प्राप्त झाल्यावरून, आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय यांना नोटीस काढून त्यांची नोंदणी नोटिशीमध्ये नमूद केलेल्या कारणांसाठी निलंबित किंवा रद्द का करण्यात येऊ नये याची कारणे दाखवण्यास फर्मावता येईल. **नोंदणी रद्द करणे किंवा निलंबित करणे.**

(२) जर, आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय यांनी या अधिनियमाच्या किंवा नियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचा भंग केला आहे याबाबत समुचित प्राधिकरणाची

---

[१] सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम १७ द्वारे, पोटकलम (१) ऐवजी दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

खात्री पटली तर, त्यांना त्यांची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि सल्लागार समितीचा सल्ला विचारात घेतल्यानंतर, त्यास असे केंद्र, प्रयोगशाळा किंवा चिकित्सालय यांच्याविरुद्ध करता येईल अशा कोणत्याही फौजदारी कार्यवाहीस बाध येऊ न देता, त्यास योग्य वाटेल त्या मुदतीकरिता त्यांची नोंदणी निलंबित करता येईल किंवा, यथास्थिति, रद्द करता येईल.

(३) पोटकलमे (१) आणि (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, जनहितार्थ तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे समुचित प्राधिकरणाचे मत झाले असेल तर, त्यास पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेली कोणतीही नोटीस न देता, त्याबाबतची कारणे लेखी नोंदवून कोणतेही आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय याची नोंदणी निलंबित करता येईल.

अपील.

**२१.** आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय यांना कलम २० अन्वये समुचित प्राधिकरणाकडून संमत करण्यात आलेल्या नोंदणीच्या निलंबनाचा किंवा रद्द करण्याचा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, अशा आदेशाविरुद्ध —

(एक) अपील केंद्रीय समुचित प्राधिकरणाच्या आदेशाविरुद्ध असल्यास, केंद्र सरकारकडे ; आणि

(दोन) अपील राज्य समुचित प्राधिकरणाच्या आदेशाविरुद्ध असल्यास, राज्य शासनाकडे

विहित नमुन्यात अपील करता येईल.

प्रकरण सात

## अपराध व शास्ती

[1][गर्भधारणापूर्व व प्रसव-पूर्व लिंग निर्धारणाच्या संबंधात जाहिरात करण्यास मनाई आणि त्याचे उल्लंघन करण्यासाठी शिक्षा.

**२२.** (१) गर्भ लिंग निर्धारणासाठी किंवा लिंग निवडीसाठी वापरण्यात येणारे स्वनातीत यंत्र किंवा प्रतिमादर्शक यंत्र किंवा क्रमवीक्षक किंवा अन्य कोणतेही तंत्रज्ञान जवळ बाळगणारे कोणतेही चिकित्सालय, प्रयोगशाळा किंवा केंद्र यांसह कोणतीही व्यक्ती, आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय चिकित्सालय हे अशा केंद्रात, प्रयोगशाळेत, चिकित्सालयात किंवा अन्य कोणत्याही ठिकाणी प्रसव-पूर्व लिंगनिर्धारणाच्या किंवा लिंग निवडीच्या सुविधा उपलब्ध असल्याबाबत इंटरनेटसह कोणत्याही माध्यमातून कोणतीही जाहिरात काढणार नाही व ती प्रसिद्ध, वितरित, किंवा प्रसारित करणार नाही किंवा ती काढण्याची, प्रसिद्ध करण्याची, वितरित किंवा प्रसारित करण्याची व्यवस्था करणार नाही.

(२) आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय यांसह कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला शास्त्रशुद्ध किंवा अन्य कोणत्याही पद्धतींद्वारे प्रसव-पूर्व लिंगनिर्धारण किंवा गर्भधारणा-पूर्व लिंग निवड यासंबंधातील कोणतीही जाहिरात कोणत्याही रीतीने काढणार नाही, ती प्रसिद्ध, वितरित वा प्रसारित करणार नाही किंवा ती जाहिरात काढण्याची, प्रसिद्ध करण्याची, वितरित किंवा प्रसारित करण्याची व्यवस्था करणार नाही.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या आणि दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनार्थ, " जाहिरात " यामध्ये कोणतीही नोटीस, परिपत्रक, लेबल, आवेष्टन किंवा इतर कोणताही लेख तसेच इंटरनेट किंवा इलेक्ट्रॉनिक वा मुद्रित स्वरूपातील इतर कोणत्याही प्रसारमाध्यमांद्वारे करण्यात आलेल्या जाहिराती यांचा, आणि तसेच त्यामध्ये कोणतेही जाहिरात फलक, भित्तीचित्र, संकेत, दिवा, आवाज, धूर किंवा वायू यांद्वारे करण्यात आलेले कोणतेही दृश्य प्रतिरूपण यांचादेखील समावेश होतो.

अपराध व शास्ती.

**२३.** (१) एखादे आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय ज्याच्या मालकीचे असेल किंवा जो अशा केंद्रात, प्रयोगशाळेत किंवा चिकित्सालयात नोकरीला असून तो, आपल्या व्यावसायिक किंवा तांत्रिक सेवा अशा केंद्राला, प्रयोगशाळेला किंवा चिकित्सालयाला मानसेवी तत्त्वावर किंवा अन्य प्रकारे देत असेल, आणि, जो, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करील असा कोणताही वैद्यकीय अनुवंशशास्त्रज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी किंवा कोणतीही व्यक्ती तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस आणि त्यानंतरच्या कोणत्याही दोष सिद्धीसाठी, पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या आणि पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

[2][(२) जर न्यायालयात नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीवर दोषारोप ठेवले असतील तर ते प्रकरण निकालात निघेपर्यंत नोंदणी निलंबित करण्यासह आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी आणि दोषसिद्ध झाल्यावर,

---

१. सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम १८ द्वारे, कलम २२ ऐवजी दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे, पोटकलम २ व ३ ऐवजी दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

परिषदेच्या नोंदवहीतून त्या वैद्यक व्यवसायीचे नाव, पहिल्या अपराधाकरिता पाच वर्षासाठी आणि त्यानंतरच्या अपराधाकरिता कायमचे काढून टाकण्यासाठी समुचित प्राधिकरणाकडून, संबंधित राज्य वैद्यक परिषदेला कळविण्यात येईल.

(३) जी कोणतीही व्यक्ती, कलम ४ च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी कोणत्याही गर्भवती स्त्रीवर लिंग निवड करण्याकरिता किंवा प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्राचा वापर करण्याकरिता कोणत्याही आनुवंशिकीय समुपदेशन केंद्राची, आनुवंशिकीय प्रयोगशाळेची, आनुवंशिकीय चिकित्सालयाची किंवा स्वनातीत चिकित्सालयाची किंवा प्रतिमादर्शक चिकित्सालयाची किंवा वैद्यकीय अनुवंशशास्त्रज्ञाची स्त्रीरोगशास्त्रज्ञाची स्वनतंत्रज्ञाची किंवा प्रतिमादर्शक विशेषतज्ञाची किंवा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीची किंवा इतर कोणत्याही व्यक्तीची मदत घेईल, ती व्यक्ती, पहिल्या अपराधाकरिता, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या व पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस आणि त्यानंतरच्या कोणत्याही अपराधाकरिता, पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या व एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

(४) शंका निवारणार्थ, याद्वारे अशी तरतूद करण्यात येत आहे की, पोटकलम (३) च्या तरतुदी ह्या, ज्या स्त्रीला अशा रोगनिदान तंत्राचा किंवा अशा निवडीचा वापर करण्यात भाग पाडले होते त्या स्त्रीला लागू होणार नाहीत.]

१८७२ चा १. [१][**२४.** भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एतद्‌विरुद्ध काहीही शाबित झाले नाही तर न्यायालय असे गृहीत धरील की, एखाद्या गर्भवती स्त्रीला, तिच्या पतीने किंवा, यथास्थिति, अन्य कोणत्याही नातेवाईकाने कलम ४ च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी, प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्राचा वापर करण्यास भाग पाडले होते आणि अशी व्यक्ती, कलम २३ च्या पोटकलम (३) अन्वये केलेल्या अपराधास अपप्रेरणा देण्यासाठी जबाबदार असेल आणि त्या कलमान्वये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधाच्या शिक्षेस पात्र असेल.] **प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रांचा वापर करण्याच्या बाबतीत गृहीतक.**

**२५.** जो कोणी, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे उल्लंघन करील व त्यासाठी या अधिनियमात अन्यत्र कोठेही कोणत्याही शास्तीची तरतूद केलेली नसेल त्याला तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील, आणि अशा पहिल्या उल्लंघनाचा दोष सिद्ध झाल्यानंतर असे उल्लंघन करणे चालू राहिले तर, ते जेवढे दिवस चालू राहील त्या प्रत्येक दिवसासाठी पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या अतिरिक्त द्रव्यदंडाची शिक्षा होईल. **ज्या अधिनियमांच्या किंवा नियमांच्या ज्या तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल कोणत्याही विनिर्दिष्ट शिक्षेची तरतूद केलेली नसेल अशा अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दलची शास्ती.**

**२६.** (१) या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध एखाद्या कंपनीने केला असेल त्याबाबतीत अपराध घडला त्यावेळी जी व्यक्ती, कंपनीचे कामकाज चालू ठेवण्यासाठी कंपनीची प्रभारी होती किंवा कंपनीला जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती तसेच, कंपनी ही, अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि ती तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा होण्यास पात्र असेल : **कंपन्यांनी केलेले अपराध.**

परंतु असे की, जर, तो अपराध त्या व्यक्तीच्या नकळत घडला होता किंवा तिने असा अपराध घडू नये म्हणून योग्य ती सर्व तत्परता दाखविली होती हे सिद्ध केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेली कोणतीही बाब, अशा कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही शिक्षेस पात्र ठरवू शकणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरीही, या अधिनियमाअन्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि तो अपराध, कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूकसंमतीने केला आहे किंवा त्याच्या हलगर्जीपणामुळे घडला आहे असे सिद्ध करण्यात आले असेल. त्याबाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि ते देखील त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा होण्यास पात्र असतील.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनार्थ,–

(क) " कंपनी " याचा अर्थ, कोणताही निगम निकाय असा असून त्यामध्ये एखाद्या भागीदारी संस्थेचा किंवा इतर व्यक्तिसंघाचा समावेश होतो, आणि

(ख) एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधातील "संचालक" याचा अर्थ, भागीदारी संस्थेमधील एखादा भागीदार, असा आहे.

---

[१] सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम २० द्वारे, कलम २४ ऐवजी दाखल करण्यात आले (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

**अपराध दखलपात्र अजामीनपात्र व आपसात न मिटविण्याजोगा असणे.**

**२७.** या अधिनियमाअन्वये प्रत्येक अपराध हा, दखलपात्र, अजामीनपात्र व आपसात न मिटविण्याजोगा असेल.

**अपराधांची दखल.**

**२८.** (१) कोणतेही न्यायालय,—

(क) संबंधित समुचित प्राधिकरण, किंवा केंद्र सरकार किंवा यथास्थिति, राज्य शासन, यांनी याबाबतीत प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी किंवा समुचित प्राधिकरण ; किंवा

(ख) जिने, अभिकथित अपराधाबाबत आणि न्यायालयाकडे तक्रार करण्याच्या आपल्या इराद्याबाबत [१] [ पंधरा दिवसांपेक्षा] कमी नसेल इतक्या दिवसांची नोटीस विहित केलेल्या रीतीने समुचित प्राधिकरणाकडे दिली असेल अशी व्यक्ती,

यांच्याकडून तक्रार प्राप्त झाल्याशिवाय या अधिनियमाखालील अपराधाची दखल घेणार नाही.

**स्पष्टीकरण.—** या खंडाच्या प्रयोजनार्थ, " व्यक्ती " या संज्ञेमध्ये, सामाजिक संस्थेचा समावेश होतो.

(२) महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, यांच्या न्यायालयाव्यतिरिक्त कोणतेही न्यायालय, या अधिनियमाअन्वये कोणत्याही शिक्षापात्र अपराधाची न्यायचौकशी करणार नाही.

(३) पोटकलम (१) च्या खंड (ख) अन्वये, तक्रार करण्यात आली असेल त्याबाबतीत, न्यायालयास, अशा व्यक्तीच्या मागणीवरून, समुचित प्राधिकरणाच्या ताब्यातील संबंधित अभिलेखांच्या प्रती अशा व्यक्तीला उपलब्ध करून देण्यासाठी समुचित प्राधिकरणाला निदेश देता येतील.

प्रकरण आठ

## संकीर्ण

**अभिलेख ठेवणे.**

**२९.** (१) या अधिनियमाअन्वये व नियमांन्वये ठेवणे आवश्यक असलेले सर्व अभिलेख, तक्ते, नमुने, अहवाल, संमतीपत्रे व इतर सर्व दस्तऐवज दोन वर्षांच्या कालावधीकरिता किंवा विहित करण्यात येईल एवढ्या कालावधीकरिता जतन करून ठेवण्यात येईल :

परंतु असे की, एखाद्या आनुवंशिकीय समुपदेशन केंद्राच्या, आनुवंशिकीय प्रयोगशाळेच्या किंवा अनुवंशिकीय चिकित्सालयाच्या विरुद्ध कोणताही फौजदारी व अन्य खटला दाखल करण्यात आलेला असेल तर, त्या केंद्राचे, प्रयोगशाळेचे किंवा चिकित्सालयाचे अभिलेख व इतर सर्व दस्तऐवज, असा खटला अंतिमरीत्या निकालात निघेपर्यंत जतन करून ठेवण्यात येतील.

(२) असे सर्व अभिलेख, समुचित प्रधिकरणाला किंवा समुचित प्रधिकरणाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीला तपासणीसाठी सर्व वाजवी वेळी उपलब्ध करून देण्यात येतील.

**अभिलेख, इत्यादींची झडती घेणे व जप्त करणे याचा अधिकार.**

**३०.** [२][(१) जर, कोणत्याही आनुवंशिकीय समुपदेशन केंद्रामध्ये, आनुवंशिकीय प्रयोगशाळेत, आनुवंशिकीय चिकित्सालयात किंवा इतर कोणत्याही ठिकाणी, या अधिनियमाखालील एखादा अपराध करण्यात आला आहे किंवा करण्यात येत आहे असे समुचित प्राधिकरणाला सकारण वाटत असेल तर, असे प्राधिकरण किंवा याबाबतीत प्रधिकृत केलेला कोणताही अधिकारी यास, विहित करण्यात येतील अशा नियमांना अधीन राहून, अशा आनुवंशिकीय समुपदेशन केंद्रात, आनुवंशिकीय प्रयोगशाळेत, आनुवंशिकीय चिकित्सालयात किंवा इतर कोणत्याही ठिकाणी, अशा प्रधिकरणाला किंवा अधिकाऱ्याला ज्या मदतीची, कोणतीही असल्यास, आवश्यकता वाटत असल्यास अशा मदतीसह सर्व वाजवी वेळांमध्ये प्रवेश करता येईल व झडती घेता येईल आणि तेथील कोणताही अभिलेख, नोंदवही, दस्तऐवज, वही, पत्रक, जाहिरात किंवा तेथे आढळणारी इतर कोणतीही वस्तू यांची तपासणी करता येईल आणि या अधिनियमाअन्वये, शिक्षापात्र असलेला अपराध केल्याचा पुरावा म्हणून या बाबी सादर करता येतील असे या प्राधिकरणास किंवा अधिकाऱ्यास सकारण वाटत असेल तर, त्या जप्त करून त्यास मोहोरबंद करता येईल.]

[१] सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम २१ द्वारे "तीस दिवसांपेक्षा" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे पोट-कलम (१) ऐवजी दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

१९७४ चा २. (२) झडती व जप्ती या संबंधातील फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या तरतुदी, शक्य असतील तेथवर, या अधिनियमाअन्वये केलेल्या प्रत्येक झडतीस किंवा जप्तीस लागू होतील.

**सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.**

**३१.** या अधिनियमाच्या तरतुदीनुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीकरिता केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा समुचित प्राधिकरण, अथवा यांपैकी कोणीही प्रधिकृत केलेला कोणताही अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करण्यात येणार नाही.

**अडचणी दूर करणे.**

[१][**३१क.** (१) प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे (विनियमन व गैरवापरास प्रतिबंध) सुधारणा अधिनियम, २००२ च्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, केंद्र सरकारला **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल त्याप्रमाणे उक्त अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करता येतील :

परंतु असे की, प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे (विनियमन व गैरवापरास प्रतिबंध) सुधारणा अधिनियम,
२००३ चा १४. २००२ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर या कलमान्वये कोणताही आदेश दिला जाणार नाही.

(२) या कलमाअन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडण्यात येईल.]

**नियम करण्याचे अधिकार.**

**३२.** (१) या अधिनियमांच्या तरतुदी पार पाडण्यासाठी केंद्र सरकारला नियम करता येतील.

(२) विशेषकरून आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता अशा नियमांद्वारे पुढील गोष्टींची तरतूद करता येईल :—

[२][(एक) कलम ३ च्या खंड (२) अन्वये नोंदणीकृत आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय येथे नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या किमान अर्हता ;

(एकक) कलम ४ चे पोटकलम (३) याच्या परंतुकान्वये आपल्या चिकित्सालयामध्ये गरोदर महिलेवर स्वनातीत चित्रणाचा वापर करणाऱ्या एखाद्या व्यक्तीने ज्या पद्धतीने त्यांचा अभिलेख ठेवला पाहिजे, ती पद्धत ;]

(दोन) कलम ५ अन्वये गरोदर महिलेची संमती ज्या नमुन्यात घ्यावयाची आहे तो नमुना ;

(तीन) कलम ८ च्या पोटकलम (४) अन्वये केंद्रीय पर्यवेक्षी मंडळाच्या सदस्यांनी आपली कार्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(चार) कलम ९ च्या पोटकलम (५) अन्वये पदसिद्ध सदस्यांखेरीज अन्य सदस्यांना अनुज्ञेय असलेले भत्ते ;

[३][(चार क) केंद्रीय पर्यवेक्षी मंडळाने कलम १६ च्या खंड (चार) अन्वये निर्धारित केलेली आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा आणि आनुवंशिकीय चिकित्सालये येथे कार्यरत असणाऱ्या व्यक्तींनी पालन करावयाची आचारसंहिता ;

(चार ख) या अधिनियमाच्या कलम १६क, पोटकलम (१) च्या खंड (चार) अन्वये राज्यात हाती घेण्यात आलेल्या विभिन्न उपक्रमांच्या बाबतीत मंडळ आणि केंद्र सरकार यांच्याकडे राज्य किंवा संघ राज्यक्षेत्र पर्यवेक्षी मंडळे ज्या रीतीने अहवाल सादर करतील ती रीत ;

(चार ग) कलम १७क च्या खंड (घ) अन्वये अन्य कोणत्याही बाबतीत समुचित प्राधिकाऱ्याला अधिकार प्रदान करणे ;]

(पाच) कलम १७ च्या पोटकलम (८) याच्या परंतुकान्वये सल्लागार समितीच्या कोणत्याही दोन बैठकांदरम्यानचा कालावधी ;

---

[१] सन २००३ चा अधिनियम क्रमांक १४, कलम २३ द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या, कलम २४ द्वारे, खंड (एक) ऐवजी दाखल करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम २४ द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१४ फेब्रुवारी २००३ रोजी व तेव्हापासून).

(सहा) ज्या अटी व शर्तीच्या अधीन राहून एखाद्या व्यक्तीची सल्लागार समितीवर नियुक्ती करता येईल त्या अटी व शर्ती आणि कलम १७ च्या पोट-कलम (९) अन्वये, अशा समितीने अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(सात) ज्या नमुन्यात व ज्या रीतीने नोंदणीसाठी अर्ज करण्यात येईल तो नमुना व ती रीत आणि कलम १८ च्या पोट-कलम (२) अन्वये त्यासाठी भरावयाची फी ;

(आठ) कलम १८ च्या पोट-कलम (५) अन्वये आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र, आनुवंशिकीय प्रयोगशाळा किंवा आनुवंशिकीय चिकित्सालय यांनी पुरवावयाच्या सुविधा, ठेवावयाची साधनसामग्री व अन्य प्रमाणके ;

(नऊ) कलम १९ च्या पोट-कलम (१) अन्वये नोंदणी प्रमाणपत्र ज्या नमुन्यात देण्यात येईल तो नमुना ;

(दहा) ज्या रीतीने आणि ज्या कालावधीनंतर, नोंदणी प्रमाणपत्राचे नवीकरण करण्यात येईल ती रीत आणि तो कालावधी, आणि नवीकरणासाठी कलम १९ च्या पोट-कलम (३) अन्वये अनुज्ञेय असेल ती फी ;

(अकरा) कलम २१ अन्वये ज्या रीतीने अपील दाखल करण्यात येईल ती रीत ;

(बारा) कलम २९ च्या पोट-कलम (१) अन्वये ज्या कालावधीपर्यंत अहवाल, तक्ते, इत्यादी जतन करण्यात येतील असा कालावधी ;

(तेरा) कागदपत्रे, अभिलेख, वस्तू, इत्यादी, ज्या रीतीने जप्त करण्यात येतील ती रीत आणि अशा जप्त केलेल्या वस्तूंची यादी तयार करण्याची आणि अशी कागदपत्रे, अभिलेख आणि वस्तू कलम ३० च्या पोटकलम (१) अन्वये ज्या व्यक्तीच्या अभिरक्षेतून जप्त करण्यात आले होते, तिच्याकडे सुपूर्द करण्याची रीत ;

(चौदा) विहित करणे आवश्यक असणारी किंवा विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**विनियम करण्याचे अधिकार.**

**३३.** मंडळास, केंद्र सरकारच्या पूर्व मंजुरीने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विनियम करून पुढील गोष्टींची तरतूद करता येईल :—

(क) मंडळाच्या बैठकीची वेळ व ठिकाण आणि अशा बैठकीच्या कामकाजासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती, आणि कलम ९ च्या पोट-कलम (१) अन्वये गणपूर्तीसाठी आवश्यक असलेली सदस्यसंख्या ;

(ख) कलम ११ च्या पोट-कलम (१) अन्वये एखादी व्यक्ती मंडळाशी ज्या रीतीने तात्पुरती सहभागी होईल ती रीत ;

(ग) कलम १२ अन्वये नियुक्त करण्यात आलेले मंडळाचे अधिकारी व अन्य कर्मचारी यांच्या नियुक्तीची पद्धत, त्यांच्या सेवाशर्ती आणि वेतनमान व भत्ते ;

(घ) सर्वसाधारणपणे मंडळाच्या कामकाजाचे कार्यक्षम चालन.

**संसदेपुढे मांडावयाचे नियम व विनियम.**

**३४.** या अधिनियमाअन्वये केलेला प्रत्येक नियम आणि प्रत्येक विनियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमांत वा विनियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम वा विनियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, तर त्यानंतर ते नियम किंवा विनियम अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच परिणामक होतील किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाहीत ; तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये किंवा विनियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## The Pre-conception and Pre-natal Diagnostic Techniques (Prohibition of Sex Selection) Act, 1994

## गर्भधारणा-पूर्व व प्रसव-पूर्व रोग प्रतिबंध निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम, १९९४

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| genetic abnormality | आनुवंशिक अपसामान्यता | [ Long Title ] |
| sex-linked disorder | लिंग-संलग्न विकार | [ Long Title ] |
| metabolic disorder | चयापचय विकार | [ Long Title ] |
| chromosomal abnormality | गुणसूत्रीय अपसामान्यता | [ Long Title ] |
| congenital malformation | जन्मजात अपरचना | [ Long Title ] |
| conceptus | गर्भधारित | [ (S.2(ba) ] |
| sex determination | लिंग निर्धारण | [ Long Title ] |
| female foeticide | स्त्रीगर्भहत्या | [ Long Title ] |
| prohibition | प्रतिबंध | [ S.1 ] |
| product | फलन | [ (S.2(ba) ] |
| extra embryonic membrane | भ्रूणाचे बाह्य पटल | [ (S.2(ba) ] |
| embryo | भ्रूण | [ (S.2(ba) ] |
| foetus | गर्भ | [ (S.2(ba) ] |
| Genetic Counselling Centre | आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र | [ (S.2(c) ] |
| Genetic Clinic | आनुवंशिकीय चिकित्सालय | [ (S.2(d) ] |
| pre-conception | गर्भधारणा-पूर्व | [ Title ] |
| Genetic Laboratory | आनुवंशिकीय प्रयोगशाळा | [ (S.2(e) ] |
| pregnancy | गर्भार अवस्था | [ (S.2(e) Expl. ] |
| scanner | क्रमवीक्षक | [ (S.2(d) Expl. ] |
| ultrasound machine | स्वनातीत यंत्र | [ (S.2(d) Expl. ] |
| imaging machine | प्रतिमादर्शक यंत्र | [ (S.2(d) Expl. ] |
| gynaecologist | स्त्रीरोगतज्ज्ञ | [ (S.2(f) ] |
| obstetrics | प्रसूतिशास्त्र | [ (S.2(f) ] |
| medical geneticist | वैद्यकीय आनुवंशशास्त्रज्ञ | [ (S.2(g) ] |
| pre-natal diagnostic procedures | प्रसव-पूर्व रोगनिदान प्रक्रिया | [ (S.2(i) ] |
| pre-natal diagnostic techniques | प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे | [ (S.2(j) ] |
| pre-natal diagnostic test | प्रसव-पूर्व रोग निदान चाचणी | [ (S.2(k) ] |
| ultrasonography | स्वनातीत चित्रण | [ (S.2(k) ] |
| congenital anomalies | जन्मजात विसंगती | [ (S.2(k) ] |
| sonologist or imaging specialist | स्वनतंत्रज्ञ किंवा प्रतिमादर्शक विशेषज्ञ | [ (S.2(p) ] |
| tissue | ऊति | [ S.3A ] |
| gamete | युग्मक | [ S.3A ] |

| | | |
|---|---|---|
| spontaneous abortion | आकस्मिक गर्भपात | [ (S.4(3)(ii) ] |
| foetal loss | गर्भनाश | [ (S.4(3)(ii) ] |
| teratogenic agent | गर्भविकृतिकारक पदार्थ | [ (S.4(3)(iii) ] |
| mental retardation | मतिमंदत्व | [ (S.4(3)(iv) ] |
| spasticity | स्नायुतानता | [ (S.4(3)(iv) ] |
| genetic disease | आनुवंशिक रोग | [ (S.4(3)(iv) ] |
| sex of foetus | गर्भाचे लिंग | [ (S.5 M.N. ] |
| moral turpitude | नैतिक अधःपात | [ (S.14(a) ] |
| amniotic fluid | गर्भजल | [ (S.2(i) ] |
| chorionic villi | जरायु उद्वर्ध | [ (S.2(i) ] |
| foetoscopy | गर्भाचे चित्रण | [ (S.2(i) ] |
| paediatrician | बालरोगचिकित्सक | [ (S.2(h) ] |
| physical deformities | शारीरिक विरूपता | [ (S.4(3)(iv) ] |

## गर्भधारणा-पूर्व व प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध ) अधिनियम, १९९४

## The Pre-conception and Pre-natal Diagnostic Techniques (Prohibition of Sex Selection) Act, 1994

मराठी - इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| भ्रूणाचे बाह्य पटल | extra embryonic membrane | [ क. २ (खक) ] |
| आकस्मिक गर्भपात | spontaneous abortion | [ क. ४ (३) (दोन) ] |
| आनुवंशिक रोग | genetic disease | [ क. ४ (३) (चार) ] |
| आनुवंशिक अपसामान्यता | genetic abnormality | [ दीर्घ शीर्षक ] |
| आनुवंशिकीय चिकित्सालय | genetic clinic | [ क. २ (घ) ] |
| आनुवंशिकीय प्रयोगशाळा | genetic laboratory | [ क. २ (ङ) ] |
| आनुवंशिकीय समुपदेशन केंद्र | genetic counselling centre | [ क. २ (ग) ] |
| ऊति | tissue | [ क. ३क ] |
| क्रमवीक्षक | scanner | [ क. २ (घ) स्पष्टी. ] |
| गर्भ | foetus | [ क. २ (खक) ] |
| गर्भजल | amniotic fluid | [ क. २ (झ) ] |
| गर्भधारणा-पूर्व | Pre-conception | [ शिर्षक ] |
| गर्भधारित | conceptus | [ क. ४ (खक) ] |
| गर्भनाश | foetal loss | [ क. ४ (३) (दोन) ] |
| गर्भविकृतिकारक पदार्थ | teratogenic agent | [ क. ४ (३) (तीन) ] |
| गर्भाचे चित्रण | foetoscopy | [ क. २ (झ) ] |
| गर्भाचे लिंग | sex of foetus | [ क. ५ स.टी. ] |
| गर्भार अवस्था | pregnancy | [ क. २ (ङ) स्पष्टी ] |
| गुणसूत्रीय अपसामान्यता | cromosomal abnormality | [ दीर्घ शीर्षक ] |
| चयापचय विकार | Metabolic disorder | [ दीर्घ शीर्षक ] |
| जरायु उद्‌वर्ध | chorionic villi | [ क. २ (झ) ] |
| जन्मजात अपरचना | congenital malformation | [ दीर्घ शीर्षक ] |
| जन्मजात विसंगती | congenital anomalies | [ क. २ (ट) ] |
| नैतिक अधःपात | moral turpitude | [ क. १४ (क) ] |
| प्रतिबंध | Prohibition | [ क. १ ] |
| प्रतिमादर्शक यंत्र | imaging machine | [ क. २ (घ) स्पष्टी ] |
| प्रसव-पूर्व रोगनिदान चाचणी | Pre-natal diagnostic test | [ क. २ (ट) ] |
| प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे | Pre-natal diagnostic techniques | [ क. २ (ञ) ] |
| प्रसव-पूर्व रोगनिदान प्रक्रिया | Pre-natal diagnostic procedure | [ क. २ (झ) ] |
| प्रसूतिशास्त्र | Obstetrics | [ क. २ (च) ] |
| फलन | Product | [ क. २ (खक) ] |
| बालरोगचिकित्सक | Paediatrician | [ क. २ (ज) ] |
| भ्रूण | embryo | [ क. २ (खक) ] |
| मतिमंदत्व | mental retardation | [ क. ४ (३) (चार) ] |
| युग्मक | gamete | [ क. ३क ] |

| | | |
|---|---|---|
| लिंग निर्धारण | sex determination | [ दीर्घ शीर्षक ] |
| लिंग-संलग्न विकार | sex-linked disorder | [ दीर्घ शीर्षक ] |
| वैद्यकीय आनुवंशशास्त्रज्ञ | Medical geneticist | [ क. २ (छ) ] |
| शारीरिक विरूपता | physical deformities | [ क. ४ (३) (चार) ] |
| स्त्रीगर्भहत्या | female foeticide | [ दीर्घ शीर्षक ] |
| स्त्रीरोगतज्ज्ञ | gynaecologist | [ क. २ (च) ] |
| स्नायुतानता | spasticity | [ क. ४ (३) (चार) ] |
| स्वनतंत्रज्ञ किंवा प्रतिमादर्शक विशेषज्ञ | sonologist or imaging specialist | [ क. २ (त) ] |
| स्वनातीत चित्रण | Ultrasonography | [ क. २ (ट) ] |
| स्वनातीत यंत्र | Ultrasound Machine | [ क. २ (घ) स्पष्टी ] |

H 4020 L-12

भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

# गर्भधारणा-पूर्व व प्रसव-पूर्व रोगनिदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम, १९९४

**(१९९४ चा अधिनियम क्रमांक ५७)**

[ रोजी यथाविद्यमान ]

# The Pre-conception and Pre-natal Diagnostic Techniques (Prohibition of Sex Selection) Act, 1994

**(Act No. 57 of 1994)**

[*As in force on the* ]

*

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

**२०१७**

[ **किंमत** : रुपये ]